दि. कि. अर्ज क्र. १ /२०२६

Exh. 10/C

**मे. कागल येथील सि. ज. ज्यु. डि.**

**यांचे कोर्टात...**

आनंदा विठू सावंत, वगैरे ..... अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ..... वि.प.

ORDER---------

**सी. पी. सी. ऑर्डर १८ रूल ४ प्रमाणे**
**अर्जदार १ यांचे सरतपासाचे ॲफिडेव्हिट**

**ॲफिडेव्हिट**

मी यातील अर्जदार १ आनंदा विठू सावंत, व.व. ७०, धंदा : शेती रा. गिरणगल्ली, गोरंबे, ता. कागल, जि. कोल्हापूर. स्वत: करीता व अर्जदार क्र. २ करिता शपथपूर्वक ॲफिडेव्हिट करितो की,

१) यातील माझे व अर्जदार क्र. २ यांचे चूलते कै. पांडू शिवा सावंत हे ता. १५/०२/१९९८ रोजी विना आपत्य गोरंबे, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे मयत झाले असून त्यांची पत्नी हौसाबाई पांडू सावंत यादेखील ता. १७/०१/२००६ इ. रोजी मयत झाल्या आहेत. मयत पांडू शिवा सावंत यांचे भाऊ म्हणजेच माझे वडील हे देखील सन १९७२ मध्ये मयत झाले आहेत. मयत पांडू शिवा सावंत यांचे आई - वडील म्हणजेच माझी आज्जी साताबाई सावंत व आजोबा शिवा सावंत हे माझ्या जन्मापूर्वीच मयत आहेत.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

AnyScanner

त्यामुळे मयत पांडू शिवा सावंत यांना मी व अर्जदार क्र. २ हेच सरळ व कायदेशीर वारस असून त्यांखेरीज अन्य कोणीही वारस नाहीत.

२) सदर मयत कै. पांडू शिवा सावंत यांच्या गोरंबे, ता. कागल, जि. कोल्हापूर येथील स्थावर मालमत्तांचे सरकारी कागदोपत्री वारस नोंदीकरिता सरकारी व निमसरकारी अधिकाऱ्याकडून मरणोत्तर इतर लाभ मिळणेकामी आम्हा अर्जदार यांना सदर कै. पांडू शिवा सावंत यांचे कायदंशीर वारस असलेबाबत वारसा दाखल्याची मागणी होत आहे. या कारणाने प्रस्तुतचा अर्ज आम्ही मयत कै. पांडू शिवा सावंत यांचे वारस असलेबाबत मे. कोर्टाकडून वारसा दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

३) सदर मयत कै. पांडू शिवा सावंत यांच्या गोरंबे, ता. कागल, जि. कोल्हापूर येथील रहिवासी असलेने व त्याच गावी त्यांच्या स्थावर मालमत्ता असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज या मे. कोर्टात चालणेस पात्र आहे.

४) सदर कामी मी नि. ३ सोबत अ.नं. १ ला कै. पांडू शिवा सावंत यांचे मृत्यूदाखल्याची स.शि. प्रत हजर केलेली आहे. त्यामधील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर असून, त्यास नि. देणेत यावे. तसेच अ.नं. ३ व ४ ला अर्जदार यांचे आधारकार्ड व्हेरिफाईड प्रती हजर केलेल्या असून, त्यास नि. देणेत यावे.

तसेच मे. कोर्टाचे आदेशाप्रमाणे आम्ही दि. ०१/०२/२०२६ इ. रोजीचे दैनिक पुण्य नगरी या वर्तमानपत्रामध्ये जाहीरनामा प्रसिध्द केलेला आहे. सदर जाहीरनामा मधील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर असून, त्यास नि. देणेत यावे. सदर जाहीरनामा व त्याचे बिल आजरोजी कागदयादीसोबत हजर केलेले आहे.

५) सबब आमची विनंती की,

अ) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत यावा.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

SCAN AnyScanner

ब) मयत सदर कै. पांडू शिवा सावंत यांना अर्जदार नं. १ व २ हेच सख्ख वारस असलेबाबत दाखला मिळावा.

म्हणून केले ॲफिडेव्हिट.

मे. ज. व्हावे.

कागल

ता. १६/०३/२०२६

ॲफिडेव्हिट करणर यांना ओळखते.

Kasote

आ. वि. सावंत

**ॲड. के. एस. कासोटे**

## प्रतिज्ञा

यातील अर्जदार श्री. आनंदा विठू सावंत सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील ॲफिडेव्हिटमधील सर्व मजकूर माझे प्रत्यक्ष माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हिट आज मु. कागल

ता. १६/०३/२०२६

आ. वि. सावंत

PRANITA SUHAS PATIL

Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.03.16 17:00:44 +0900

Solemnly Affirmed before me by
Shri. Ananda Vithu Savant
Age 70 of Gorambe/Kagal ... who is
identified by Shri K.S. Kasote Adv
...whom I know personally
Dated :- 16/3/26

(Patil)
Assistant Superintendent

AnyScanner